# मुंबई पोलीस भरती २०१४

## वैद्यकिय चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी सूचना

महाराष्ट्र पोलीस शिपाई ( सेवाप्रवेश) नियम २०११ तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/परिपत्रके या अन्वये अंतिम गुणवत्ता यादी/वैद्यकीय चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांनी खालील नमूद हमीपत्रे देणे आवश्यक आहेत. सदर हमीपत्रातील अ.क्र १ ते ४ या हमीपत्रावर विभागातील दोन प्रतिष्ठीत साक्षीदारांच्या दिनांकीत स्वाक्षरी घेवून सदरची सर्व हमीपत्रे नियुक्ती स्विकारतांना सादर करणे आवश्यक आहेत.

१. १ महिन्याच्या कालावधीत मोटार ड्रायव्हिंग लायसन्स प्राप्त करून आदेशानुसार केव्हाही पोलीस शिपाई चालक म्हणून कर्तव्य पार पाडेन.

२. एकच आवेदन अर्ज भरल्याबाबत.

३. नियुक्तीनंतर प्रशिक्षण कालावधीत अथवा नंतर तीन वर्षाच्या कालावधीत पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास अथवा कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास प्रशिक्षणावरील खर्च व भत्याची वसूल करण्यांबाबत

४ सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत (फक्त मागासवर्गीय उमेदवारांसाठी )

५ लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र

२. तरी उमेदवारांनी वरील हमीपत्राच्या प्रती (www.mumbaipolice.maharashtra.gov.in) संकेतस्थळावरून काढून सदर हमीपत्रे पूर्ण भरून, साक्षीदारांचे नांव, पत्ता व दिनांकीत स्वाक्षरीसह नियुक्ती स्विकारतांना सादर करावीत. वरील सर्व हमीपत्रे असल्याशिवाय उमेदवारांना नियुक्ती देण्यांत येणार नाही याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

३. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीबाबत दुरध्वनीवरून त्यांनी दिलेल्या संपर्क नंबरवर कळविण्यात येईल. नियुक्तीपत्र स्विकारण्यासाठी येतांना पोलीस भरती २०१४ ची ओळखपत्रे, वैद्यकीय चाचणी पात्र झाल्यानंतर दिलेले निवडपत्र, सर्व हमीपत्रे आणि सर्व मूळ प्रमाणपत्रे सोबत आणावीत.

४. तसेच नियुक्ती स्विकारल्यानंतर तात्काळ प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येईल. त्याकरिता उमेदवाराने नियुक्ती स्विकारण्यासाठी येताना मेस ॲडव्हॉन्स रू.२०००/—(रूपये दोन हजार मात्र) व निवडपत्रात नमूद केलेल्या अ.क्र.५ मधील सर्व दैनंदिन गरजेच्या वस्तू आणणे आवश्यक आहे.

**( टिप :— कोणत्याही उमेदवाराने आपल्यासोबत चैनीच्या वस्तू किंवा किंमती वस्तू उदा. मोबईल फोन, सोन्याचे दागिने इत्यादी आणू नयेत. अशा वस्तू हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास कोणतीही तक्रार घेतली जाणार नाही. )**

**सही/—**
**( विजय चव्हाण )**
अध्यक्ष, मुंबई पोलीस भरती २०१४ तथा,
अपर पोलीस आयुक्त, सशस्त्र पोलीस, नायगांव,
मुंबई.

# मुंबई पोलीस भरती – २०१४ प्रक्रियेंतर्गत उमेदवारांनी द्यावयाचे हमीपत्र ( **Undertaking** )

**मी** ..................................................., **रोल क्र.** ............................................... **छाती क्र.** .................... स्वेच्छेने असे हमीपत्र देतो/देते की माझी मुंबई पोलीस भरती २०१४ प्रक्रियेंतर्गत '' **पोलीस शिपाई/ पोलीस शिपाई चालक** '' पदावर अंतिम गुणवत्ता यादीनुसार निवड झाली आहे.

२. पोलीस भरतीच्या जाहिरातीत नमूद केल्यानुसार सन २०१४ च्या एकाच पोलीस भरती प्रक्रियेतून माझी पोलीस शिपाई/ पोलीस शिपाई चालक पदी निवड झाली असण्याची बाब मला माहीत असून मी पोलीस शिपाई चालक पदी नियुक्ती नाकारल्यास माझा पोलीस शिपाई/ पोलीस शिपाई चालक यापैकी कोणत्याही पदावर नियुक्तीचा हक्क राहणार नाही, हि बाब सुध्दा मला माहित असून मान्य आहे.

३. मी स्वेच्छेने असे हमीपत्र ( **Undertaking** ) देतो/देते की, मी **पोलीस शिपाई/ पोलीस शिपाई चालक** या कोणत्याही पदावर काम करण्यास तयार आहे. भविष्यात याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

*४. माझाजवळ मोटार ड्रायव्हिंग लायसन्स क्र. ............................................(**Valid upto** ) असून मी केव्हाही आदेशानुसार चालक शिपाई म्हणून ड्रायव्हिंगचे कर्तव्य बजावेन.

*५. माझ्याजवळ मोटार ड्रायव्हिंग लायसन्स आजमितीस नाही. मात्र मी १ महिन्याच्या काळात मोटार ड्रायव्हिंग लायसन्स (**MDL**) प्राप्त करून घेईन आणि आदेशानुसार केव्हाही चालक शिपाई म्हणून कर्तव्य बजावेन.

**उमेदवाराची सही व दिनांक**

ठिकाण : मुंबई

दिनांक :

**साक्षीदार**

| नाव | पत्ता | सही/ दिनांक |
|---|---|---|
| १) .......................................... | ..................................... | |
| २) .......................................... | ..................................... | |

*** आवश्यक नाही ते खोडावे**

# मुंबई पोलीस भरती – २०१४

## हमीपत्र

मी श्री/श्रीमती ..................................................... रोल क्र. ............................... छाती क्र. ................. वय......वर्षे राहणार ...................................................................... हमीपत्र खालील प्रमाणे लिहून देतो/देते की,

२. माझी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवर पोलीस शिपाई/ पोलीस शिपाई चालक या पदावर निवड झाली असून सन २०१४ च्या पोलीस भरतीच्या वेळी मी जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे अन्य कोणत्याही पोलीस घटकात आवेदन अर्ज भरलेला नाही अथवा अन्य कोणत्याही पोलीस घटकात आवेदन अर्ज भरल्याचे अथवा अन्य पोलीस घटकात भरतीकरिता उपस्थित राहिल्याचे निदर्शनास आल्यास माझी **पोलीस शिपाई/ पोलीस शिपाई** चालक पदी झालेली निवड/नियुक्ती रद्द करण्यास तसेच माझ्या विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यास मी पात्र राहिन.

३. सदरचे हमीपत्र मी स्वत: वाचले असून दि. ..................... रोजी दिले आहे व ते बरोबर आहे.

सही

**साक्षीदार**

| नाव | पत्ता | सही/ दिनांक |
|---|---|---|
| १) .......................................... | ..................................... | |
| २) .......................................... | ..................................... | |

**हमीपत्र लिहून देणार ( उमेदवार )**

**( श्री/श्रीमती ...............................................)**

# मुंबई पोलीस भरती – २०१४

## हमीपत्र

मी श्री/श्रीमती ................................................... रोल क्र. ...............................
छाती क्र. ................. वय.......वर्षे राहणार ..................................................................
.. हमीपत्र खालील प्रमाणे लिहून देतो/देते की,

२. मी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवर पोलीस शिपाई/ पोलीस शिपाई चालक या पदावर नियुक्त झाल्यानंतर प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरून कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास माझ्या प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च, प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासह वसूल करण्यात यावा.

३. म्हणून सदरचे हमीपत्र मी स्वतः वाचले असून दि. .................... रोजी दिले आहे व ते बरोबर आहे.

( उमेदवाराची सही )

**साक्षीदार**

| नाव | पत्ता | सही/ दिनांक |
|---|---|---|
| १) ......................................... | .................................... | |
| २) ......................................... | .................................... | |

हमीपत्र लिहून देणार ( उमेदवार )

( श्री/श्रीमती .............................................)

## शासन, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि. २८ मार्च २००५

## महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम, २००५

### नमूना “ अ ”

( नियम ४ पहा )

**मी श्री/श्रीमती ........................................................ रोल क्र. ............................**

**छाती क्र. .............................. श्री. ........................................................**

**यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय..........वर्षे, राहणार ..................................................**

**..............................................................या द्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,**

१) मी पोलीस शिपाई/ पोलीस शिपाई चालक या पदासाठी अर्ज दाखल केला असून सदर पदावर माझी निवड झाली आहे.

२) मी विवाहित असून आज दि. ..................... रोजी मला ................(संख्या) इतकी मुले आहेत. त्यापैकी दिनांक .......................... यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या......... आहे. ( असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा )

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक ......................नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

| **मुलांची नावे** | **जन्मदिनांक** | **वय** |
|---|---|---|
| १) | | |
| २) | | |

**ठिकाण** :

**दिनांक** :

**उमेदवाराचे नाव,**
**सही व दिनांक**

**<u>महत्वाच्या तरतूदी :—</u>**

१) ‘ लहान कुटुंब ’ याचा अर्थ दोन मुले यासह पत्नी व पती असा आहे.

२) एखादया जोडप्यास हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकाला म्हणजेच दि. २८ मार्च २००५ ला किंवा त्यानंतर केवळ एकच मूल असेल त्याबाबतीत, नंतरच्या एकाच प्रसूतीत जन्मलेल्या कोणत्याही एकापेक्षा अधिक मुलांना एकच अपत्य म्हणून समजण्यात येईल.

३) हे नियम अंमलात येणाच्या दिनांकास ( २८ मार्च २००५ ) दोनापेक्षा अधिक मुले असणाऱ्या व्यक्तीस, अशा अंमलबजावणीच्या दिनांकास ( २८ मार्च २००५ ) असलेल्या तिच्या मुलांच्या संख्येत जोपर्यंत वाढ होत नाही. तोपर्यत या खंडाखाली, नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येणार नाही. परंतु आणखी असे की, हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकापासून ( २८ मार्च २००५ ) एका वर्षाच्या कालावधीत एकाच प्रसूतीमध्ये जन्मलेले मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या अनर्हतेच्या प्रयोजनासाठी विचारात घेण्यात येणार नाही.

# मुंबई पोलीस भरती — २०१४

## हमीपत्र

मी श्री/श्रीमती ................................................... **रोल क्र.** ...............................

**छाती क्र.** ...................... याद्वारे खालीलप्रमाणे हमीपत्र लिहून देतो/देते आहे.

मुंबई पोलीस भरती २०१४ प्रक्रियेंतर्गत माझी ........................... या मागास प्रवर्गातून पोलीस शिपाई/ पोलीस शिपाई चालक पदासाठी निवड झाली असून शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. बीसीसी २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६ ब, दि. १२ डिसेंबर २०११ मधील निर्देशानुसार माझ्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून माझी वर नमूद पदावर तात्पुरती नियुक्ती करण्यात आली आहे.

२. वर नमूद शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करून घेणे आवश्यक असल्याची बाब नियुक्ती अधिकाऱ्यांनी मला समक्ष सांगितली आहे. यास्तव याद्वारे मकी अशी हमी देत आहे की, पो.शि./ पो.शि. चालक पदावरील नियुक्ती स्विकारताच माझ्या जातीची वैधता तपासण्यासाठी त्याबाबतचा प्रस्ताव मी संबंधीत जात पडताळणी समितीकडे तात्काळ सादर करून जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत मा. पोलीस उप आयुक्त, मुख्यालय २, मुंबई ( कक्ष — ९ कनिष्ठ आस्थापना ) यांच्याकडे तात्काळ सादर करीन.

३. जात पडताळणी समितीने माझे जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास, मला दिलेल्या नियुक्तीचे आदेश रद्द होवून माझ्याविरूध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग ( जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन ) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार कारवाई होण्यास मी पात्र ठरेन याची मला समक्ष माहिती देण्यात आली आहे.

४. वर नमूद टंकलिखित मजकूर मी स्वत: वाचला असून मी आज दि. ..................... रोजी हे हमीपत्र स्वत: देत आहे.

**साक्षीदार**

| नाव | पत्ता | सही/ दिनांक |
|---|---|---|
| १) ........................................ | .................................... | |
| २) ........................................ | .................................... | |

**उमेदवाराची सही व दिनांक**